ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणे बाबत.(श्री.ओंकार ईश्वर आवटे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत चांदेखुर्द तालुका कर्जत)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ई.क्र १८६६२८२
दिनांक - १६ / ०९ /२०२५

संदर्भ–१.या कार्यालयाचे आदेश क्र.ग्रापं-३/३७५/२३, दिनांक २२.०५.२०२३ (सेवा निलंबन आदेश)

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (३)(१)

३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (३)(५)

४. शासन निर्णय क्र.निप्रआ११२२/प्र.क्र.०९/विचौ२/२०२५,दिनांक २२ एप्रिल २०२५

५. सेवा निलंबन आढावा समिती मधील सूचना दि.०७.०७.२०२५.

संदर्भ क्रमांक ०१ चे आदेशान्वये,श्री. ओंकार ईश्वर आवटे,तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत चांदेखुर्द तालुका कर्जत यांना कार्यालयीन कामकाजात ग्रामपंचायत चांदेखुर्द तालुका कर्जत येथे कार्यरत असताना त्यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने व मिरजगांव पोलीस स्टेशन गु.र.नं.९२/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ (अ) प्रमाणे दिनांक- ११/०४/२०२३ रोजी गुन्हा दाखल झालेला असून जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करणेत आलेले आहे.

संदर्भ क्र.५ मधील चर्चेनुसार व संदर्भ क्रमांक ४ चे शासन निर्णयानुसार श्री.ओंकार ईश्वर आवटे सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा यांचा निलंबन कालावधी हा तीन महिन्यांपेक्षा अधिक झालेला असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा सक्षम प्राधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्री.ओंकार ईश्वर आवटे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत चांदेखुर्द तालुका कर्जत यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती --पारनेर-- ------------ येथे पुन:स्थापित करीत आहे.

श्री.ओंकार ईश्वर आवटे,सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी,पंचायत समिती कर्जत यांचा या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय,पुढील सुरु असलेली शिस्तभंगविषयक कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल. जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थापित आदेशाची नोंद,श्री.ओंकार ईश्वर आवटे,सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुळ सेवा पुस्तकात संबधीत खाते प्रमुख यांनी घ्यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९१६०६०११२ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 16-09-2025 19:05:44
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. ओंकार ईश्वर आवटे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत चांदेखुर्द तालुका कर्जत. (सेवानिलंबन मुख्यालय पंचायत समिती कोपरगाव)

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव

२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबतची पोहच कार्यालयास अहवाल सादर करावी

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत/कोपरगाव यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर

२/- श्री.ओंकार ईश्वर आवटे सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी हे हजर झालेनंतर अहवाल इकडेस सादर करावा.